सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक १८ • गुरुवार दि.८ ऑक्टोंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## विरोधकांचे सलग तिसऱ्या दिवशी आंदोलन

नवी दिल्ली:मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी इंडिया आघाडीने दिल्लीतील आंदोलनाची धार तीव्र केली आहे. सलग दोन दिवस पोलिसांनी राहुल गांधी यांच्यासह विरोधी पक्षांच्या खासदारांना ताब्यात घेतल्यानंतर आज तिसऱ्या दिवशी इंडिया आघाडीचे सुमारे ३०० खासदार राजघाटावर आंदोलन करणार आहेत. त्यामुळे दिल्लीतील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

ज्ञानेश कुमार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या मदतीने देशातील लोकशाही संपविण्याचे काम केल्याचा गंभीर आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला. मतचोरीच्या आरोपांवरून निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित पान ४ वर

# ‘नटसम्राट’ ची एक्झिट

# नाना पाटेकरांचे निधन

## आज सायंकाळी शासकीय इतमामात अंत्यविधी



**मुंबई/प्रतिनिधी-मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील आपल्या दमदार अभिनयाने, प्रभावी संवादफेकीने आणि वेगळ्या व्यक्तिमत्त्वाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर अर्थात नटसम्राट यांचे आज पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. गोव्यातील डोना पावला येथील आपल्या निवासस्थानी त्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यानंतर त्यांना तातडीने मणिपाल रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी सुमारे ४५ मिनिटे त्यांना वाचविण्याचे प्रयत्न केले; मात्र उपचारांना प्रतिसाद न मिळाल्याने पहाटे ५.२० वाजता त्यांना मृत घोषित करण्यात आले. त्यांच्या पार्थिवावर आज सायंकाळी पुण्यातील त्यांच्या फामहाऊसवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.**

नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी समोर येताच मराठी तसेच हिंदी चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली. आपल्या कारकिर्दीत त्यांनी गंभीर, खलनायकी, विनोदी तसेच सामाजिक आशयाच्या विविध भूमिका साकारून अभिनयाची स्वतंत्र छाप निर्माण केली. पडद्यावरचा प्रभावी अभिनेता म्हणून ओळख निर्माण करण्याबरोबरच सामाजिक कार्यातही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. विश्वनाथ गजानन पाटेकर ऊर्फ नाना पाटेकर यांचा जन्म १ जानेवारी १९५१ रोजी रायगड जिल्ह्यातील मुरुड-जंजिरा येथे झाला. मुंबईतील सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये त्यांनी शिक्षण घेतले. अभिनयाच्या क्षेत्रात येण्यापूर्वी त्यांनी चित्रपटांची पोस्टर्स तयार करण्याचे काम केले. पुढे प्रायोगिक रंगभूमीशी त्यांचा संबंध आला. ज्येष्ठ दिग्दर्शिका विजया मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी रंगभूमीवर अभिनयाला सुरुवात केली. पुरुष आणि हमीदाबाईची कोठी यांसारख्या नाटकांमधील त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या.

**गमनपासून रुपेरी पडद्यावर एन्ट्री**

नाना पाटेकर यांनी १९७८ मध्ये गमन या चित्रपटातून हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. सुरुवातीच्या काळात छोट्या भूमिका केल्यानंतर अंकुश आणि प्रतिघात या चित्रपटांनी त्यांना व्यापक ओळख मिळवून दिली. १९८९ मधील परिंदा चित्रपटातील अण्णा ही त्यांनी साकारलेली खलनायकी भूमिका विशेष गाजली. या भूमिकेसाठी त्यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्काराने गौरविण्यात आले.

यानंतर प्रहार, तिरंगा, क्रांतिवीर, अग्निसाक्षी, खामोशी, अब तक छप्पन, अपहरण आणि राजनीती यांसारख्या चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. वेलकम आणि वेलकम बॅकमधील उदय शेट्टी या विनोदी भूमिकेतूनही त्यांनी प्रेक्षकांचे मनोरंजन केले. मराठी चित्रपटसृष्टीतही त्यांनी आपल्या अभिनयाची वेगळी छाप सोडली.

**पद्मश्रीसह अनेक पुरस्कारांचा मान**

नाना पाटेकर यांच्या अभिनय कारकिर्दीला अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले. परिंदा, क्रांतिवीर आणि अग्निसाक्षी या चित्रपटांतील अभिनयासाठी त्यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाले. २०१३ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले. सर्वोत्कृष्ट अभिनेता, सर्वोत्कृष्ट सहअभिनेता आणि सर्वोत्कृष्ट खलनायक या तिन्ही फिल्मफेअर श्रेणींमध्ये पुरस्कार मिळविणारे ते एकमेव अभिनेते असल्याचे उपलब्ध नोंदी सांगतात.

**दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी नामचा आधार**

चित्रपटसृष्टीतील यशाबरोबरच नाना पाटेकर यांनी सामाजिक बांधिलकीही जपली. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी त्यांनी अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या सहकार्याने २०१५ मध्ये नाम फाऊंडेशनची स्थापना केली. संस्थेच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त भागात जलसंधारण, शेतकरी मदत आणि गावांच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले.

**शासकीय इतमामात अंत्यसंस्कार**

पुण्याजवळील डोणजे गावातील त्यांच्या फार्महाऊसवर अंत्यविधीची तयारी सुरु करण्यात आली आहे. नानाची वाडी येथे गुरुवारी त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. नाम फाउंडेशन आणि स्थानिक ग्रामस्थांकडून अंत्यविधीची तयारी सुरू असून, चाहते व चित्रपटसृष्टीतील मान्यवरांची उपस्थिती अपेक्षित आहे.

## राजकीय नेत्यांसह कलावंतांची भावपूर्ण श्रद्धांजली

**बहुआयामी प्रतिभेचा कलावंत-पंतप्रधान मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नाना पाटेकर यांच्या अभिनयातील तीव्रता, स्वतंत्र शैली आणि प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे स्मरण केले. प्रत्येक भूमिकेत त्यांनी वैविध्य आणि सर्जनशीलता दाखवली. त्यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखा अनेक पिढ्यांच्या स्मरणात राहतील. हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतील त्यांचे योगदान मोठे असून त्यांच्या निधनाने मोठी पोकळी निर्माण झाली आहे, असे मोदी यांनी म्हटले.

**कलाविश्वाची अपूरणीय हानी-अमित शाह**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नाना पाटेकर यांच्या निधनाला कलाविश्वाची अपूरणीय हानी असल्याचे म्हटले. त्यांच्या नैसर्गिक अभिनयाने आणि प्रभावी संवादफेकीने भारतीय चित्रपटसृष्टीवर अमिट ठसा उमटविला. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून निघणे कठीण असल्याचे शाह यांनी नमूद केले.

**महाराष्ट्रातील रांगडा अभिनेता-फडणवीस**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाना पाटेकर यांच्या निधनावर दुःख व्यक्त करत महाराष्ट्राने रांगडा, परखड आणि संवेदनशील अभिनेता गमावल्याचे म्हटले.क्रांतिवीरपासून नटसम्राटपर्यंत त्यांच्या अभिनयातील विविधता आणि खोली कायम स्मरणात राहील. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी तसेच जलसंधारणाच्या कामातही नाना नेहमी पुढे असायचे, अशी आठवण फडणवीस यांनी सांगितली.

**पडद्याबाहेरही माणुसकी जपली-गडकरी**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नाना पाटेकरांच्या अभिनयासोबतच त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे स्मरण केले. शेतकरी, जलसंधारण आणि ग्रामीण भागातील कामांसाठी नाना यांनी केलेले योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले.

**संवेदनशील कलावंत-शरद पवार**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी नाना पाटेकर यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. अभिनयासोबतच सामाजिक प्रश्नांबाबत संवेदनशील असलेल्या नाना पाटेकरांच्या कार्याची आठवण त्यांनी जागवली.

**कलाविश्वातूनही दुःखाचा सूर**

अभिनेते अक्षयकुमार, परेश रावल, मनोज बाजपेयी, मनिषा कोईराला आणि उर्मिला मातोंडकर यांच्यासह अनेक कलाकारांनी नाना पाटेकरांना श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या अभिनयातील तीव्रता, प्रामाणिकपणा आणि पडद्यावरील प्रभावी उपस्थितीचा कलाकारांनी उल्लेख केला.

**अनुपम खेर**-अभिनेते अनुपम खेर यांनी नाना यांच्या स्पष्टवक्तेपणाची आणि बेधडक स्वभावाची पान ४ वर

## बिरादार गॅस एजन्सीचा नरसी पॉईंट सहा महिन्यांपासून बंद

### ३५ किमी दूर देगलूरहून गॅस आणण्याची वेळ;सणासुदीच्या काळात ग्राहकांची गैरसोय

नायगाव/प्रतिनिधी-देगलूर येथील बिरादार गॅस एजन्सीचा नरसी येथील अधिकृत गॅस वितरण पॉईंट मागील सहा महिन्यांपासून बंद असल्याने नरसी परिसरातील ग्राहकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. मागील २० ते २५ वर्षांपासून नरसी येथे या एजन्सीचा अधिकृत पॉईंट कार्यरत होता. त्यामुळे परिसरातील मोठ्या संख्येने ग्राहक या एजन्सीशी जोडलेले आहेत.

मात्र, नरसी येथील गॅस पॉईंट बंद झाल्याने ग्राहकांना आता थेट देगलूर येथून गॅस सिलिंडर आणावा लागत आहे. नरसी ते देगलूर हे सुमारे ३५ किलोमीटरचे अंतर असल्याने गॅस आणण्यासाठी ग्राहकांना मोठा प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे वेळ, वाहनाचा खर्च आणि श्रम यांचा अतिरिक्त भार ग्राहकांवर पडत आहे.विशेषतः सणासुदीच्या काळात घरगुती गॅसची मागणी वाढत असताना स्थानिक पातळीवर गॅस वितरणाची सुविधा उपलब्ध नसल्याने ग्राहकांमध्ये नाराजी वाढत आहे. अनेक वर्षांपासून नरसी येथे उपलब्ध असलेली सुविधा अचानक बंद झाल्याने ग्राहकांना त्याचा फटका बसत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.नरसी परिसरातील ग्राहकांची संख्या मोठी असल्याने संबंधित गॅस एजन्सीने नरसी येथील पॉईंट तातडीने सुरु करून नियमित गॅस वितरणाची व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे. नरसी येथे गॅस वितरण करणे शक्य नसल्यास, नरसी येथील ग्राहकांना नायगाव येथील गॅस एजन्सीशी जोडून त्यांच्या घराजवळ गॅस उपलब्ध करून द्यावा, अशीही मागणी ग्राहकांकडून करण्यात येत आहे.गेल्या सहा महिन्यांपासून सुरू असलेल्या या समस्येकडे महसूल प्रशासन तसेच संबंधित गॅस वितरण यंत्रणेने लक्ष देऊन ग्राहकांची गैरसोय दूर करावी. विशेषतः सणासुदीच्या काळात ३५ किलोमीटर अंतरावरून गॅस आणण्याची वेळ ग्राहकांवर येऊ नये, यासाठी नरसी येथे तातडीने गॅस वितरणाची सुविधा सुरू करावी, अशी मागणी नरसी परिसरातील ग्राहकांकडून होत आहे.




काँग्रेसचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व लोकसभेचे विरोधी पक्षनेते खा.राहुल गांधी, खा.प्रियंका गांधी यांच्यासह इंडिया आघाडीच्या नेत्यांना आंदोलना दरम्यान दिल्ली पोलीसांनी अटक केल्याच्या निषेधार्थ काँग्रेसच्यावतीने आज (गुरुवार) आयटीआय चौकातील महात्मा फुले यांच्या पुतळ्यासमोर आंदोलन करण्यात आले.

## भाऊराव चव्हाण कारखान्यात शेतकऱ्यांची रक्कम रखडली!

### सभासद शेतकऱ्यांचा उपोषणाचा इशारा




नांदेड/प्रतिनिधी-खा.अशोकराव चव्हाण यांच्या कार्यक्षेत्रातील भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना, देगाव-येळेगावकडून २०१३-१४ आणि २०१४-१५ या हंगामातील ऊस विकास योजनेअंतर्गत सभासद शेतकऱ्यांना देय असलेली प्रोत्साहनपर थकबाकी अद्याप पूर्णपणे मिळालेली नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. ही रक्कम तातडीने मिळावी, यासाठी सभासद शेतकऱ्यांनी प्रादेशिक सहसंचालक साखर, शुभांगी गोंड यांना निवेदन दिले असून, महिनाभरात प्रश्न मार्गी न लागल्यास कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याने २०१३-१४ आणि २०१४-१५ या हंगामात ऊस विकास योजनेनुसार प्रतिटन १०० रुपये प्रोत्साहनपर रक्कम देण्याचे जाहीर केले होते. २४ सप्टेंबर २०१५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत याबाबत ठरावही मंजूर करण्यात आला. संबंधित रकमेवर ८ टक्के व्याज आकारणी करून आठ वर्षांत दामदुप्पट योजना लागू करण्यासही सभासदांनी मंजुरी दिल्याचे निवेदनात नमूद आहे. मात्र, ठरावाला तब्बल अनेक वर्षे उलटूनही सभासद शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची संपूर्ण रक्कम मिळालेली नसल्याचा दावा करण्यात आला आहे. थकबाकीदार शेतकऱ्यांची यादी मागितल्यानंतर कारखान्याकडून माहिती देण्यास नकार देण्यात आल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

दरम्यान, माहिती अधिकार कार्यकर्ते शंकर मारोतराव इंगळे यांनी याबाबत राज्य माहिती आयोगाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात द्वितीय अपील दाखल केले होते. अपील क्रमांक ७००१/२०२४ मध्ये १९ मे २०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार संबंधित माहिती उपलब्ध असलेल्या कार्यालयाकडून संकलित करून ३० दिवसांत विनामूल्य उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले होते. या आदेशाची अंमलबजावणी अद्याप झालेली नसल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. खरीप हंगामातील पिकांचे नुकसान आणि आर्थिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना त्यांची थकीत प्रोत्साहनपर रक्कम तातडीने देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दीपावलीपूर्वी रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केल्यास त्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळेल, असेही निवेदनात म्हटले आहे.

कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील आ.ॲड. श्रीजया चव्हाण तसेच खासदार व माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी या प्रकरणात लक्ष घालून सभासद शेतकऱ्यांची थकबाकी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे भाऊराव चव्हाण साखर कारखान्याच्या थकीत प्रोत्साहनपर रकमेचा प्रश्न आता ऐन दीपावलीच्या तोंडावर पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## एमपीएससी विद्यार्थ्यांना पुणे पोलिसांची नोटीस

पुणे:एमपीएससीच्या कारभाराविरोधात गेल्या पाच-सहा दिवसांपासून एस. एम. जोशी पूल परिसरात सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पुणे पोलिसांनी धक्का दिला आहे. वाहतूक कोंडी आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे कारण देत पोलिसांनी आंदोलनाची परवानगी नाकारली असून, विद्यार्थ्यांना परिसर तातडीने रिकामा करण्याची नोटीस बजावली आहे.

एमपीएससीच्या परीक्षा पद्धतीतील त्रुटी दूर कराव्यात, आयोगाच्या कारभारात पारदर्शकता आणावी आणि अध्यक्षांनी राजीनामा द्यावा, या मागण्यांसाठी हजारो विद्यार्थी आंदोलनात सहभागी झाले आहेत. आंदोलनाला विविध राजकीय नेते व सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनीही भेट देऊन पाठिंबा दिला आहे.एस. एम. जोशी पूल हा वर्दळीचा मार्ग असल्याने आंदोलनामुळे वाहतुकीवर परिणाम होत असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पाठीमागे प्रशासनाने निश्चित केलेल्या अधिकृत जागेवर आंदोलन करावे, अशी सूचना करण्यात आली आहे. पोलिसांच्या या निर्णयानंतर विद्यार्थी आंदोलनाची पुढील दिशा काय असणार, याकडे लक्ष लागले आहे.

# प्रभावी अभिनेता काळाच्या पडद्याआड



भारतीय नाट्य आणि चित्रपटसृष्टीने देशाला अनेक उत्तुंग अभिनेते दिले. मात्र काही कलाकार केवळ पडद्यावरच्या भूमिकांमुळे मोठे होत नाहीत; ते आपल्या अभिनयाच्या पलीकडे जाऊन समाजाच्या मनाचा भाग बनतात. नाना पाटेकर हे अशाच दुर्मीळ कलाकारांपैकी एक होते. त्यांच्या निधनाने केवळ एक अभिनेता काळाच्या पडद्याआड गेला नाही, तर समाजाचे भान जपणारे, अन्यायावर अस्वस्थ होणारे आणि आपल्या कलेला सामाजिक संवेदनशीलतेची जोड देणारे एक प्रभावी व्यक्तिमत्त्व हरपले आहे. त्यामुळे त्यांचे जाणे ही नाट्य, चित्रपटसृष्टी बरोबरच संवेदनशील समाजमनाचीही मोठी हानी आहे. पूर्वीच्या काळात नाटक आणि चित्रपट हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नव्हते. समाजातील विसंगती, अन्याय, विषमता, शोषण आणि माणसाच्या जगण्यातील संघर्ष यांचे प्रतिबिंब त्या माध्यमांतून उमटत असे. कलाकाराच्या कलेमागे सामाजिक दृष्टिकोन असणे हीदेखील त्याची जबाबदारी मानली जात होती. काळ बदलला, मनोरंजनाचे स्वरूप बदलले आणि व्यावसायिकतेचा प्रभाव वाढला. त्यामुळे अभिनयातील सामाजिक बांधिलकी अनेकदा दुय्यम ठरताना दिसते. अशा परिस्थितीत नाना पाटेकर यांच्यासारखा कलाकार वेगळा ठरतो.अनेक अभिनेते भूमिका आत्मीयतेने साकारतात; परंतु नाना पाटेकर यांनी भूमिका साकारली की ती व्यक्तिरेखा केवळ पडद्यावरची राहत नसे. ती जिवंत होत असे. त्यांच्या संवादफेकीतला आवेश, चेहऱ्यावरील भाव, देहबोली आणि प्रसंगातील भावनिक गुंतवणूक यामुळे प्रेक्षकाला कलाकार दिसत नसे, तर त्या भूमिकेतील माणूस दिसत असे. म्हणूनच 'परिंदा', 'क्रांतिवीर', 'प्रहार', 'नटसम्राट', 'अब तक छप्पन' यांसारख्या अनेक चित्रपटातील भूमिकांनी त्यांच्या अभिनयाची स्वतंत्र मुद्रा निर्माण केली. गंभीर भूमिका असो किंवा विनोदी व्यक्तिरेखा, नाना त्यात स्वतःची वेगळी छाप सोडत.पण नाना पाटेकर यांचे मोठेपण केवळ अभिनयापुरते मर्यादित नव्हते. महाराष्ट्रातील दुष्काळ, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि ग्रामीण भागातील संकटे याबाबत त्यांनी केवळ व्यासपीठावर सहानुभूती व्यक्त केली नाही, तर प्रत्यक्ष मदतीचा हात पुढे केला. 'नाम फाउंडेशन'च्या माध्यमातून पाणी संवर्धन, जलसंधारण आणि संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी केलेले काम त्यांच्या सामाजिक जाणिवेची साक्ष देणारे आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना दिलेला आधार अनेकांच्या आयुष्यात आशेचा किरण ठरला. कलाकार म्हणून प्रसिद्धी मिळवणे सोपे असू शकते; परंतु प्रसिद्धीच्या झोतात राहून समाजातील दुःखाकडे पाठ न फिरवणे ही खरी कसोटी असते. नाना पाटेकर यांनी ही कसोटी आपल्या कृतीतून पार केली. त्यांनी समाजसेवा ही प्रसिद्धीचे साधन न बनवता ती माणुसकीची जबाबदारी मानली. म्हणूनच त्यांच्या निधनानंतर त्यांची आठवण केवळ त्यांच्या चित्रपटांपुरती मर्यादित राहणार नाही. नानांचा आवाज आता पडद्यावर ऐकू येणार नाही, त्यांच्या अभिनयातील ती तीव्रता नव्या भूमिकेत दिसणार नाही; पण त्यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखा आणि त्यांनी केलेले सामाजिक कार्य पुढील पिढ्यांना प्रश्न विचारत राहील, कलाकार होणे म्हणजे केवळ प्रसिद्धी मिळवणे की समाजाप्रती असलेली जबाबदारीही स्वीकारणे? नाना पाटेकर यांचे आयुष्य या प्रश्नाचे उत्तर देऊन गेले आहे. कला आणि सामाजिक संवेदनशीलता यांचा सुंदर संगम घडवणारा हा प्रभावी अभिनेता आज काळाच्या पडद्याआड गेला असला, तरी त्यांची कला, त्यांचा आवाज आणि माणुसकीची जाणीव दीर्घकाळ समाजाच्या स्मरणात राहील.नाना पाटेकर अमर रहे!

# नाना पाटेकर:पडद्यावरचा अंगार,आयुष्यातला माणूस

अभिनयाच्या पलीकडे जाऊन माणुसकीची भाषा बोलणाऱ्या अस्सल कलावंत असणाऱ्या नानाला अखेरचा सलाम!

काही कलाकार पडद्यावर येतात, भूमिका करतात आणि निघून जातात. काही कलाकार मात्र भूमिका जगतात आणि पडदा संपल्यानंतरही आपल्या मनात जिवंत राहतात. नाना पाटेकर हे अशाच दुर्मीळ कलाकारांपैकी एक. त्यांच्या निधनाने केवळ मराठी किंवा हिंदी चित्रपटसृष्टीचे नव्हे, तर भारतीय अभिनयविश्वाचे एक समर्थ, अस्सल आणि बेधडक पर्व संपले आहे.

८ ऑक्टोबर २०२६ रोजी वयाच्या व्या वर्षी नाना पाटेकर यांनी गोव्यात अखेरचा श्वास घेतला. नाना गेले हे दोन शब्द उच्चारतानाही मन मानायला तयार होत नाही. संघर्षातून घडलेला कलावंत असणाऱ्या नाना पाटेकर यांचे मूळ नाव विश्वनाथ पाटेकर. १ जानेवारी १९५१ रोजी महाराष्ट्रात जन्मलेल्या या कलाकाराने मुंबईतील सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्समधून शिक्षण घेतले. रंगभूमीपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास पुढे भारतीय चित्रपटसृष्टीतील एका विलक्षण अभिनयशैलीत परिवर्तित झाला.

१९७८ मध्ये गमन या चित्रपटातून त्यांच्या हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रवासाला सुरुवात झाली. पुढे अंकुश, प्रतिघात, मोहरे, परिंदा, प्रहार, तिरंगा, क्रांतिवीर, अग्निसाक्षी, खामोशी, अब तक छप्पन, अपहरण, वेलकम, राजनीती अशा अनेक चित्रपटांनी त्यांच्या अभिनयाची विविध रूपे प्रेक्षकांसमोर आणली. परिंदाचा अंधार आणि क्रांतिवीरचा अंगार असणारा नाना परिंदामधील अण्णा ही व्यक्तिरेखा असो किंवा क्रांतिवीर मधील प्रताप नारायण तिलक, नाना पाटेकर यांनी भूमिका साकारल्या नाहीत, तर त्या व्यक्तिरेखांना रक्त-मांसाचा जीव दिला.

क्रांतिवीरमधील त्यांचा संताप, अस्वस्थ आणि व्यवस्थेला प्रश्न विचारणारा नायक आजही भारतीय चित्रपटातील अविस्मरणीय व्यक्तिरेखांपैकी एक मानला जातो. या भूमिकेसाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कारासह अनेक पुरस्कार मिळाले. परिंदा आणि अग्निसाक्षीसाठीही त्यांच्या अभिनयाला राष्ट्रीय पातळीवर गौरव मिळाला. त्यांच्या आवाजात एक वेगळीच ताकद होती. संवाद बोलताना ते केवळ शब्द उच्चारत नसत; शब्दांच्या मागची वेदना, संताप, उपरोध आणि माणूसपण प्रेक्षकांपर्यंत पोहोचवत. 'प्रहार' : अभिनेता ते दिग्दर्शक असणारा नाना केवळ अभिनेते नव्हते. त्यांनी प्रहार : द फायनल अटॅक या चित्रपटातून दिग्दर्शनाची धुरा सांभाळली. सैनिकांचे जीवन, शिस्त, संघर्ष आणि देशसेवेची भावना यांना त्यांनी संवेदनशीलतेने पडद्यावर मांडले.

त्यांच्या कलाकृतींमध्ये मनोरंजनाबरोबरच सामाजिक वास्तवाची जाणीव होती. म्हणूनच नाना पाटेकर यांचा अभिनय हा केवळ करमणुकीचा विषय राहिला नाही; तो अनेकदा समाजाच्या विवेकाला हलवणारा आरसा ठरला.

'नटसम्राट':अभिनयाचा सर्वोच्च क्षण जगणाऱ्या मराठी रंगभूमीच्या आत्म्याशी नाना पाटेकर यांचे नाते विशेष होते. नटसम्राटमधील गणपतराव बेलवलकर ही भूमिका त्यांच्या कारकिर्दीतील अत्यंत महत्त्वाची शिखररेषा ठरली.

टाळ्यांचा कडकडाट अनुभवलेला कलाकार वृद्धापकाळात आयुष्याच्या रंगमंचावर एकाकी होतोही वेदना नानांनी इतक्या



ताकदीने साकारली की प्रेक्षकांना गणपतराव दिसला, नाना पाटेकर नव्हे.हीच तर महान अभिनयाची खरी कसोटी!

**'वेलकम'चा उदय शेट्टी:गंभीर कलाकारातील विनोदाचा चेहरा**

नाना म्हणजे फक्त गंभीर, संतप्त आणि वेदनादायी भूमिका नव्हेत. वेलकममधील उदय शेट्टीने त्यांच्या अभिनयातील विनोदी बाजूही तितक्याच प्रभावीपणे दाखवली.उदय शेट्टीच्या देहबोलीपासून आवाजातील चढ-उतारापर्यंत त्यांनी निर्माण केलेले विनोदी विश्व आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहे.वेलकम आणि वेलकम बॅकमधील ही भूमिका त्यांच्या बहुआयामी अभिनयाची वेगळीच ओळख ठरली.

**पंडित पवळे**
**शिक्षणयोगी,नांदेड**

**'अब तक छप्पन'चा साधासुधा, पण धारदार पोलिस अधिकारी**

अब तक छप्पनमध्ये साध्या वेशातील पोलिस अधिकारी साधू आगाशे ही भूमिका त्यांनी इतक्या संयतपणे साकारली की मोठमोठे संवाद नसतानाही व्यक्तिरेखेचा दरारा जाणवत राहतो. नानांच्या अभिनयाचे हे आणखी एक वैशिष्ट्यते पडद्यावर आरडाओरडा न करता देखील प्रसंगावर अधिराज्य गाजवू शकत.

लोकांच्या मनातील स्थान असणाऱ्या नाना पाटेकर यांना तीन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांसह अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार मिळाले. २०१३ मध्ये त्यांना पद्मश्रीने सन्मानित करण्यात आले.मात्र एखाद्या कलाकाराची खरी कमाई पुरस्कारांच्या कपाटात नसते; ती प्रेक्षकांच्या स्मरणात असते.नानांची ही कमाई अफाट आहे.

पडद्याबाहेरचा ग्रेट माणूस असणाऱ्या नाना पाटेकर यांच्याबद्दल बोलताना त्यांच्या अभिनयाइतकेच त्यांच्या माणूसपणाचे स्मरण करणे आवश्यक आहे.शेतकरी, गरजू आणि आपत्तीग्रस्तांसाठी मदतीचा हात पुढे करण्याच्या त्यांच्या कार्याची अनेकदा चर्चा झाली.शेतकरी कुटुंबांना मदत करण्यासाठी त्यांनी स्वतःच्या प्रसिद्धीपेक्षा प्रत्यक्ष मदतीला महत्त्व दिले. २०२६ मध्ये एका महागड्या कारऐवजी तिच्या रकमेतून शेतकरी कुटुंबांना मदत करण्याची त्यांची भूमिका चर्चेत आली होती. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे संकटात माणसाच्या पाठीशी उभे राहणे. नुकत्याच समोर आलेल्या एका आठवणीत अभिनेते अशोक सराफ यांनी सांगितले की, नाट्यदौऱ्यात निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीत नाना पाटेकर यांनी त्यांना सुरक्षितपणे गर्दीतून बाहेर काढले आणि स्वतः रिक्षा चालवत सुरक्षित ठिकाणी पोहोचवले.ही घटना त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील एका महत्त्वाच्या गुणाची साक्ष देते. पडद्यावरचा नायक असणे सोपे असते; पण संकटाच्या क्षणी दुसऱ्याच्या जीवासाठी धावून जाणारा माणूस असणे मोठे असते.साधेपणातले मोठेपण नाना पाटेकर यांचा स्वभाव स्पष्टवक्तेपणासाठीही ओळखला जात असे. ते आपले मत लपवत नसत.त्यांच्या बोलण्यात गोडवा कमी आणि प्रामाणिकपणा अधिक असे.त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक विरोधाभास होता-पडद्यावर ते कधी संतापाचा ज्वालामुखी वाटत, तर प्रत्यक्ष आयुष्यात गरजू माणसासाठी मायेने हात पुढे करणारा संवेदनशील माणूस दिसत.म्हणूनच नाना पाटेकरांना केवळ महान अभिनेता म्हणणे अपुरे ठरेल.ते कलाकार होते, दिग्दर्शक होते, संवेदनशील नागरिक होते आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे माणूस होते.

नाना पाटेकर म्हणजे एक अभिनयशाळाच. नानांनी अभिनयाची कोणतीही एक चौकट स्वीकारली नाही. खलनायक असो, पोलिस अधिकारी असो, क्रांतिकारी असो, राजकारणी असो, सैनिक असो, विनोदी व्यक्तिरेखा असो किंवा वृद्ध रंगकर्मी प्रत्येक व्यक्तिरेखेला त्यांनी स्वतःची स्वतंत्र ओळख दिली. त्यांचा अभिनय शिकवतो की,भूमिका मोठी नसते; कलाकाराच्या अंतर्मनातील प्रामाणिकपणा मोठा असतो.त्यांचा आवाज शिकवतो की,संवाद शब्दांनी नव्हे, अनुभवांनी बोलायचा असतो.त्यांचे जीवन शिकवते की,प्रसिद्धी मिळवणे मोठे नाही; प्रसिद्धीनंतरही माणूस राहणे मोठे आहे.

नाना नावाचा एक युगपुरुष असणारा आज नाना पाटेकर आपल्यात नाहीत.पण परिंदाचा अंधार, क्रांतिवीरचा अंगार, प्रहारची शिस्त, नटसम्राटची वेदना, अब तक छप्पनचा दरारा आणि वेलकमचा उदय शेट्टी या साऱ्या भूमिका त्यांना पुन्हा पुन्हा आपल्या भेटीला आणत राहतील. काळ कलाकारांना घेऊन जातो;पण खरा कलाकार काळालाही मागे टाकतो.नाना पाटेकर यांचा देह आज आपल्यात नाही; पण त्यांचा आवाज, त्यांचा अभिनय, त्यांचे संवाद, त्यांची अस्वस्थ करणारी नजर आणि माणसासाठी धडपडणारे त्यांचे मन हे भारतीय समाजाच्या सांस्कृतिक स्मृतीत दीर्घकाळ जिवंत राहील.

नाना गेले नाहीतते त्यांच्या प्रत्येक भूमिकेतून पुन्हा पुन्हा जन्म घेत राहतील.अशा या अस्सल मराठी मातीतील, भारतीय अभिनयविश्वाला समृद्ध करणाऱ्या आणि माणूसपणाला आपल्या कर्मातून अर्थ देणाऱ्या महान कलावंताला भावपूर्ण श्रद्धांजली! नाना पाटेकर यांना विनम्र अभिवादन.अभिनेता गेला;पण नाना नावाचा माणूस कायमचा अमर झाला.

# नाना,तू तुझ्या चाहत्यांशी गद्दारी केलीस!



नाना, खरंच सांगतो

तू तुझ्या चाहत्यांशी गद्दारी केलीस!

असं अचानक निघून जायचं असतं का? काहीही न सांगता, कुठलाही निरोप न देता एका क्षणात लाखो चाहत्यांना पोरकं करून जायचं असतं का?

तुझ्या निधनाची बातमी कानावर आली आणि मन सुन्न झालं. विश्वासच बसेना. पडद्यावर शेकडो भूमिका जगणारा हा अभिनेता आज आपल्या आयुष्यातून कायमचा एक्झिट घेऊन गेला, ही जाणीवच मनाला चटका लावून जाते.

तुझ्या अभिनयाची जादू वेगळीच होती. तू भूमिका करत नव्हतास; ती भूमिका जगत होतास. क्रांतिवीरमधील प्रताप नारायण तिलक, प्रहारमधील मेजर चौहान, अब तक छप्पनमधील साधू आगाशे, तिरंगामधील शिवाजीराव वागळे, वेलकममधील उदय शेट्टी आणि नटसम्राटमधील अप्पा बेलवलकरप्रत्येक व्यक्तिरेखा तू आपल्या अभिनयाने अजरामर केलीस.

तुझे पुरुष आणि हमीदाबाईची कोठी ही नाटके पाहताना तर असे वाटायचे की, नाना अभिनय करत नाहीये; तो त्या व्यक्तिरेखेत पूर्णपणे शिरला आहे. रंगमंचावर तुझा वावर, संवादफेक, देहबोली आणि चेहऱ्यावरचे भाव पाहताना समोर अभिनेता नसून प्रत्यक्ष व्यक्तिरेखाच उभी आहे, असा भास व्हायचा.पडद्यावरचा तुझा अभिनय जितका प्रभावी होता, तितकाच रंगमंचावरचा नाना अधिक जवळून भिडायचा. कारण रंगमंचावर कॅमेरा नव्हता, कट नव्हता, पुन्हा टेक नव्हता होता तो फक्त तुझा जिवंत अभिनय आणि समोर बसलेला प्रेक्षक. त्या थेट संवादात तू प्रेक्षकांना अक्षरशः आपल्या अभिनयाच्या विश्वात घेऊन जायचास.

म्हणूनच पुरुष आणि हमीदाबाईची कोठी पाहताना अनेकदा मनात एकच विचार यायचाहा माणूस अभिनय करतोय की आपण प्रत्यक्ष आयुष्य पाहतोय? विशेषतः नटसम्राटमधील अप्पा बेलवलकर ही भूमिका म्हणजे तुझ्या अभिनयाची सर्वोच्च उंची. एका महान रंगकर्मीच्या आयुष्यातील वेदना, एकटेपण, असहायता आणि आयुष्याची उतरती कळा तू ज्या ताकदीने साकारलीस, त्यामुळे असंख्य प्रेक्षकांच्या डोळ्यांत अश्रू आले.

**धर्मभूषण ॲड.दिलीप ठाकूर**
**नांदेड**

पण नाना, तुझी ओळख केवळ अभिनेता म्हणून नव्हती. पडद्याबाहेरचा माणूस नानाही तितकाच मोठा होता.नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून तू शेतकरी आणि ग्रामीण भागासाठी केलेली सेवा ही तुझ्या कलाकारीइतकीच मोठी आणि प्रेरणादायी आहे. संकटात सापडलेल्या, दुष्काळ आणि कर्जबाजारीपणामुळे खचलेल्या शेतकऱ्यांच्या आयुष्यात पुन्हा आशेचा किरण निर्माण करण्यासाठी तू केलेले काम असंख्य कुटुंबांसाठी आधार ठरले. पडद्यावर अनेक व्यक्तिरेखा साकारणारा तू, प्रत्यक्ष आयुष्यात मात्र शेतकऱ्यांच्या दुःखात सहभागी होऊन माणुसकीची भूमिका जगलास.

याच नाम फाऊंडेशनच्या कार्यक्रमासाठी तू नांदेडला आला होतास. त्या वेळी तुझी प्रत्यक्ष भेट घेण्याचा मला योग आला. माझ्या आयुष्यातील तो एक अविस्मरणीय क्षण आहे.

तुझं भाषण तर अफलातून होतं!

तू भाषण करत नव्हतास; तू उपस्थितांशी संवाद साधत होतास. सभागृहातील प्रत्येक व्यक्तीशी तू थेट बोलतो आहेस, अशी भावना निर्माण व्हायची. तुझ्या बोलण्यात कृत्रिमपणा नव्हता. साधी भाषा, थेट विचार, मिश्किलपणा आणि अनुभवातून आलेली स्पष्टता तुझ्या प्रत्येक शब्दातून जाणवत होती.

कधी तू हसवायचास, कधी विचार करायला भाग पाडायचास, तर कधी एखादा साधा प्रश्न विचारून संपूर्ण सभागृह अंतर्मुख करायचास. उपस्थितांशी संवाद साधण्याची तुझी ती शैली खरोखरच अफलातून होती.

आज त्या भेटीची आठवण पुन्हा पुन्हा डोळ्यांसमोर येते आहे. त्या दिवशी तुझ्यासोबत घालवलेले ते काही क्षण आता आयुष्यभराची अमूल्य आठवण बनून राहतील.

तुझे चित्रपट पुन्हा पाहता येतील. तुझे संवाद पुन्हा ऐकता येतील. तुझ्या भूमिका पुन्हा अनुभवता येतील. पण नांदेडमध्ये प्रत्यक्ष भेटलेला तो नाना पुन्हा कधीच भेटणार नाही, ही जाणीव मनाला अस्वस्थ करून जाते.

म्हणूनच आज मनापासून वाटतं

नाना, तू तुझ्या चाहत्यांशी गद्दारी केलीस!

अजून खूप भूमिका बाकी होत्या

अजून खूप संवाद ऐकायचे होते

अजून खूप वेळ तुला पडद्यावर पाहायचं होतं

आणि कदाचित अजून एकदा नांदेडला तुला भेटायचं होतं

पण तू अचानक निघून गेलास.

तू अभिनेता म्हणून महान होतासच; पण त्यापेक्षा मोठा माणूस होतास. तुझ्या अभिनयाची उंची आणि तुझ्या माणुसकीची खोली दोन्ही विलक्षण होती.

म्हणूनच तुझं जाणं म्हणजे केवळ एका अभिनेत्याचं निधन नाही, तर एका मोठ्या कलायुगाचा पडदा पडल्यासारखं आहे.

तुझा आवाज थांबला असेल,

पण तुझ्या भूमिका बोलत राहतील

तुझा अभिनय जिवंत राहील

शेतकऱ्यांसाठी केलेली तुझी सेवा प्रेरणा देत राहील

आणि नांदेडमधील तुझी ती अविस्मरणीय भेट माझ्या स्मरणात कायम जिवंत राहील.

नाना, तुला मनःपूर्वक भावपूर्ण श्रद्धांजली!

# जलसंधारणाच्या कामांना गती देण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

माहूर/प्रतिनिधी-पावसाने पाठ फिरवल्याने माहूर तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीची दाहकता मंगळवारी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या प्रत्यक्ष पाहणीत समोर आली. पाण्याचा प्रत्येक थेंब अडविण्यासाठी जलतारा अंतर्गत मोठ्या प्रमाणात जलसंधारणाची कामे हाती घेऊन योजना प्रभावीपणे राबवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कर्डिले यांनी दिले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, सहाय्यक जिल्हाधिकारी बी सरवण तहसीलदार अभिजित जगताप यांची उपस्थिती होती.जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, यांनी लखमापूर ग्रामपंचायतीला भेट देऊन जलतारा अंतर्गत कामाचे उद्घाटन केले. माहूर तालुक्यात पावसाने दडी मारल्याने खरीप पिकांसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेक गावांमध्ये पाण्याची उपलब्धता घटली असून, शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे टाकले आहे. या पार्श्वभूमीवर जलसंधारणाची कामे दुष्काळावर मात करण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहेत.

सायं दैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# मराठी भाषा अस्मिता तेवत ठेवण्याची जबाबदारी समाजाची-श्रीकांत देशमुख

नांदेड/प्रतिनिधी-मराठी भाषेचा इतिहास अडीच हजार वर्षे जुना असून मराठीचे संवर्धन करण्यात गाथासप्तशती, महात्मा चक्रधर, संत मंडळ, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, वि. रा. शिंदे, बहिणाबाई चौधरी अशा महानुभावांचे योगदान राहिले आहे. अभिजात मराठी भाषेविषयीची अस्मिता जपण्याचे आणि तिचे अस्तित्व तेवत ठेवण्याची जबाबदारी समाजाची आहे, असे मत साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक श्रीकांत देशमुख यांनी व्यक्त केले.

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अभिमान मराठी अभिजात मराठी' कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी उद्घाटक म्हणून श्रीकांत देशमुख बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर उपस्थित होते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्यात आला. 'अभिजात मराठी, अभिमान मराठी' या सांस्कृतिक कार्यक्रमासोबत 'शब्दांची जुलगबंदी' स्पर्धा, निमंत्रितांचे कवी संमेलन आणि कथाकथनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी कलावंतांचे कौतुक केले. विविध गीते व नृत्ये यांच्या बहारदार सादरीकरणातून मराठी भाषेची पालखी कलावंत घेऊन आले आहेत, असे ते म्हणाले. कार्यक्रमास विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, डॉ. ज्ञानेश्वर पवार, डॉ. बाबासाहेब भोसले, डॉ. एम. के. पाटील, राजेश सोळंके, डॉ. राजेश शिंदे, डॉ. पराग खडके, दिनेश गायकवाड, राजू कदम, नंदकिशोर जुवेकर, डॉ. पृथ्वीराज तौर, डॉ. राजपाल चिखलीकर, डॉ. रुपाली जैन, डॉ. अशोक कदम यांची उपस्थिती होती.

# 'शिक्षण सुटणार असेल तर जगायचे तरी कोणाच्या जिवावर?'

## विद्यार्थ्यांच्या आक्रोशातून आत्मदहनाचा इशारा

नांदेड/प्रतिनिधी-डोळ्यांत अश्रू आणि हातात न्यायाची अपेक्षा घेऊन आम्ही आलो आहोत... निसर्गाने आमचे पीक करपवून टाकले, बापाच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर साचला आहे. घरात रोजच्या जेवणाची भ्रांत असताना आम्ही नांदेडसारख्या शहरात राहून शिकायचे कसे? शिक्षणच सुटणार असेल तर आम्ही जगायचे तरी कोणाच्या जिवावर? असा अत्यंत हृदयद्रावक प्रश्न विचारत मुखेड तालुक्यातील हवालदिल झालेल्या विद्यार्थ्यांनी निवासी उपजिल्हाधिकारी देवकुळे यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवून मुखेड तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करून तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांचे सर्व प्रकारचे शैक्षणिक शुल्क माफ करावेत अशी मागणी केली आहे.

डोंगराळ, खडकाळ आणि कोरडवाहू असलेल्या मुखेड तालुक्याचा समावेश 'ट्रिगर-वन' अंतर्गत दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्यात आलेला नसल्यामुळे विद्यार्थ्यांना दुष्काळात संपूर्ण शैक्षणिक शुल्क भरावी लागत आहे. ही अत्यंत वेदनादायी आणि दुर्दैवी बाब आहे.दुष्काळामुळे शेतकरी कुटुंबे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत. अशा कठीण परिस्थितीत उच्च शिक्षण घेऊन कुटुंबाला गरिबीतून बाहेर काढण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क आकारली जात आहे. यामुळे शेतकऱ्याबरोबर विद्यार्थी संकटात सापडले आहेत. त्यामुळे या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन मुखेड तालुक्याचा तात्काळ 'ट्रिगर-वन' मध्ये समावेश करून संपूर्ण तालुका अधिकृतपणे दुष्काळग्रस्त घोषित करण्यात यावा, तसेच तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांचे सर्व प्रकारचे शैक्षणिक शुल्क (परीक्षा शुल्क, ट्यूशन फी, हॉस्टेल फी इत्यादी) पूर्णपणे माफ करण्यात यावे, अशी आक्रमक मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे.वेळ निघून जाण्यापूर्वी आम्हाला आणि आमच्या शेतकरी मायबापाला न्याय द्या अशी आर्त साद घालत पवन जगडमवार यांनी निवासी उपजिल्हाधिकारी देवकुळे यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठविले आहे. जर शासनाने तात्काळ न्यायाची भूमिका घेतली नाही आणि विद्यार्थ्यांची सर्व शैक्षणिक शुल्क माफ झाली नाही, तर १२ ऑक्टोबर रोजी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पवन जगडमवार यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. यावेळी पवन जगडमवार यांच्यासह ओंकार देशमुख, ओंकार पन्नमवाड, ज्ञानेश्वर जाहिरे, ओंकार जाहिरे, चल्लावार नागेश, शेख रफिक यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.



शिवालय महिला उद्योग समुहाच्या अध्यक्षा सौ.संध्याताई बालाजी कल्याणकर यांच्या वाढदिवसानिमित्त सुमन बालगृह येथे सहसंपर्कप्रमुख संतोष भारसावडे यांच्यावतीने अन्नदान करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे, नारायण कदम, अनिल पाटील बोरगावकर, प्रल्हाद जोगदंड, नवनाथ काकडे, गणेश बोकारे, घनश्याम सूर्यवंशी व इतर उपस्थित होते.

# पाणी वापरात काटकसर करा-जिल्हाधिकारी

नांदेड/प्रतिनिधी-पाणी बचत, पुनर्वापर आणि जलसंधारणाच्या उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, उद्योग, बांधकाम क्षेत्र तसेच व्यापारी व व्यावसायिक आस्थापनांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

अल्-निनोच्या संभाव्य प्रभावामुळे आगामी काळात पर्जन्यमानात घट होण्याची शक्यता आणि उपलब्ध जलसाठ्यावर निर्माण होणारा ताण लक्षात घेता ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुरक्षित ठेवण्यासाठी आतापासूनच प्रभावी नियोजन व उपाययोजना करणे आवश्यक आहे. उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने, प्राधान्यक्रमाने व नियोजनबद्ध पद्धतीने वापर करावा. शासनाच्या निर्देशानुसार १६ ऑक्टोबर २०२६ पासून पाणी वापरामध्ये किमान १० टक्के कपात करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक उपाययोजना कराव्यात. उपलब्ध जलसाठ्याचे नियोजन करताना पिण्याच्या पाण्यास प्रथम व सर्वोच्च प्राधान्य द्यावे. आगामी कालावधीत संभाव्य पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी सर्व संबंधितांनी प्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्राधान्य द्यावे. सर्व शासकीय कार्यालये, विभाग व त्यांच्या अधिनस्त आस्थापनांनी पाण्याचा अनावश्यक वापर टाळावा. कार्यालयीन इमारती, शासकीय निवासस्थाने, उद्याने तसेच इतर ठिकाणी होणारी पाणीगळती तात्काळ शोधून दुरुस्त करावी. शक्य त्या ठिकाणी प्रक्रिया केलेले अथवा पुनर्वापरयोग्य पाणी उद्याने, स्वच्छता, बांधकाम आणि अन्य पिण्याव्यतिरिक्त कामांसाठी वापरावे.विभागाच्या अखत्यारितील विहिरी, तलाव, टाक्या व अन्य जलस्रोतांचा अनावश्यक अथवा बेकायदेशीर उपसा होणार नाही, याची दक्षता घ्यावी. अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांमध्ये पाणी बचत व जलसंधारणाबाबत जनजागृती करावी.

# बळेगावच्या शेतकऱ्यांची हाक;आ.राजेश पवारांची तत्परता

## २४ तासांत वीज डीपी सुरु,शेतकरी समाधानी

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव तालुक्यातील गोदावरी नदीकाठावरील बळेगाव येथील शेतकऱ्यांची नादुरुस्त झालेली वीज डीपी अखेर अवघ्या २४ तासांत दुरुस्त करून सुरू करण्यात आली. आ. राजेश पवार यांच्याकडे शेतकऱ्यांनी दूरध्वनीवरून समस्या मांडताच त्यांनी तातडीने दखल घेत संबंधित महावितरणच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे शेतीपंपांचा खंडित झालेला वीजपुरवठा पूर्ववत झाल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

बळेगाव परिसरातील वीज डीपी नादुरुस्त झाल्याने अनेक शेतकऱ्यांच्या शेतीपंपांचा वीजपुरवठा बंद झाला होता. खरीप हंगामातील शेतीची कामे सुरू असताना वीजपुरवठा खंडित झाल्याने शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण झाल्या होत्या. याबाबत शेतकऱ्यांनी आ. राजेश पवार यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून नादुरुस्त डीपीची समस्या त्यांच्या निदर्शनास आणून दिली. शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेत आ. पवार यांनी तातडीने संबंधित महावितरण यंत्रणेशी संपर्क साधला. त्यानंतर महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी डीपीच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले. अवघ्या २४ तासांच्या आत वीज डीपी दुरुस्त करून वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. त्यामुळे बळेगाव परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, तातडीने समस्या सोडविल्याबद्दल शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी शेतकरी दीपक आनंदराव बेलकर, तिरुपती बाबाराव बेलकर, साईनाथ व्यंकटी मोरे, आनंद प्रल्हादराव बेलकर आणि मारुती हरिचंद्र बेलकर यांनी आ. राजेश पवार यांचे आभार मानले.

# पांडुरंग सूर्यवंशीने बसमध्ये सापडलेला महागडा टॅब पोलिसांकडे केला सुपूर्द

देगलूर/प्रतिनिधी-बस प्रवासात सापडलेला महागडा टॅब स्वतःकडे न ठेवता कर्तव्यदक्ष पोलीस अधिकाऱ्याकडे सुपूर्द करत एका शाळकरी विद्यार्थ्याने प्रामाणिकपणाचा नवा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. पांडुरंग वसंत सूर्यवंशी असे या विद्यार्थ्याचे नाव असून, त्याच्या या कृतीबद्दल पोलीस प्रशासनासह देगलूर परिसरातून त्याचे मोठे कौतुक होत आहे.

पांडुरंग वसंत सूर्यवंशी हा वझरगा येथील रहिवासी असून, तो देगलूर येथील 'मानव्य विकास विद्यालय' येथे इयत्ता १० वीच्या वर्गात शिक्षण घेत आहे. सोमवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी शाळा सुटल्यानंतर तो बसने वझरगा येथे आपल्या घरी परतत होता. प्रवासादरम्यान त्याला बसच्या सीटवर एक महागडा टॅब बेवारस अवस्थेत पडलेला आढळला. कोणत्याही आमिषाला बळी न पडता पांडुरंगने तो टॅब त्याच्या मूळ मालकाला मिळावा यासाठी तत्परता दाखवली. सोमवारी संध्याकाळी घरी पोहोचल्यावर त्याने ही बाब कुटुंबीयांना सांगितली. त्यानंतर सकाळी पांडुरंगने आपले वडील वसंत सूर्यवंशी यांच्यासह उपविभागीय पोलीस अधिकारी किरण पोपळघट यांच्या कार्यालयात जाऊन परिविक्षाधीन पोलीस अधिकारी वैभव पडवळ



यांच्या स्वाधीन तो टॅब केला. यावेळी पोपळघट यांचीही प्रमुख उपस्थिती होती.विद्यार्थ्यामध्ये असलेली ही सचोटी आणि सामाजिक भान पाहून उपविभागीय पोलीस अधिकारी किरण पोपळघट व वैभव पडवळ यांनी पांडुरंग सूर्यवंशी आणि त्याच्या पालकांचे विशेष कौतुक केले.दरम्यान, संबंधित टॅब परिविक्षाधीन पोलीस अधिकारी वैभव पडवळ यांच्याकडे जमा करण्यात आला असून, ज्या कोणाचा हा टॅब गहाळ झाला असेल त्या मूळ मालकाने आवश्यक ती खात्रीशीर कागदपत्रे व पुरावे दाखवून देगलूर पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# पंचशील विद्यालयात पद्मश्री नाना पाटेकर यांना श्रद्धांजली

हदगाव/प्रतिनिधी-शहरातील पंचशील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात प्रसिद्ध अभिनेते पद्मश्री नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

शाळेचे मुख्याध्यापक अनिल दस्तूरकर यांनी नाना च्या दुःखद निधना विषयी माहिती देऊन त्यांच्या काही चित्रपटातील अभिनया विषयी तसेच नाम फाउंडेशन विषयी विद्यार्थ्यांना माहिती देऊन त्यांच्या कार्याला उजाळा दिला. नाना पाटेकर यांच्या



निधनाचे वृत्त दुःखद असून मनाला वेदना देणारे आहे असे सांगत दस्तूरकर यांनी संस्था, शाळा प्रशासन व विद्यार्थ्यातर्फे नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. श्रद्धांजली शोकसभेचे सूत्रसंचालन विजय कांबळे पळसेकर यांनी केले.

# पत्रकार गोविंद करवा यांना मातृशोक

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव येथील पत्रकार गोविंद करवा यांच्या मातोश्री श्रीमती पुष्पाबाई बालाप्रसाद करवा (वय ७५



वर्षे) यांचे आज, गुरुवार दि.८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने करवा परिवारावर शोककळा पसरली आहे.

त्या गोविंद करवा, गोपाल करवा व अमोल करवा यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पार्थिवावर आजच सायंकाळच्या सुमारास हदगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# जिल्ह्यात शस्त्र व जमावबंदी आदेश लागू

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यात आगामी काळात विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम, यात्रा, मिरवणुका तसेच संभाव्य आंदोलने होणार आहेत. नवरात्रोत्सव, माहूर येथील रेणुकामाता यात्रा, दसरा, विजयादशमी, धम्मचक्र प्रवर्तन दिन, शीख समाजाचे विविध कार्यक्रम तसेच अन्य सामाजिक कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ३७ (१) (३) अन्वये नांदेड जिल्ह्यात दि. ९ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. २३ ऑक्टोबर रोजी मध्यरात्रीपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश लागू करण्यात आला आहे. या आदेशानुसार सार्वजनिक ठिकाणी किंवा त्याच्या जवळपास शस्त्रे, काठ्या, लाठ्या, सोटे, तलवारी, भाले, बंदुका, सुरे किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल अशा वस्तू बाळगण्यास मनाई आहे.


## जाहीर प्रगटन

मा.आर.पी.शिंदे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज १४५८/२०२६
विमल व ईतर वि. निरंक

अर्जदार:- १. विमल भ्र. सदबा घोरबांड वय ७४ वर्षे, धंदा घरकाम, २. गुलाब पि.सदबा घोरबांड, वय ४३ वर्षे, धंदा मजुरी, दोघे रा.ज्ञानेश्वरनगर, हडको, नांदेड, ३. उषाताई भ्र. जगन्नाथ सावले वय ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा. पिंपळगाव, आयब ता.लोहा ४. जयश्री भ्र.रामेश्वर हासुले वय ४८ वर्षे, धंदा घरकाम रा. सप्तश्रृंगी अपार्टमेंट, आलोरी, नविन मुंबई ठाणे, ५. रेणुका भ्र. बालाजी गोरे, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. वर्तक नगर, पोलीस स्टेशन जवळ, ठाणे, ६. रेखा भ्र. प्रभाकर कदम, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम रा. अंबिका दर्शन अपार्टमेंट, उल्हासनगर, ठाणे, ७. संगिता भ्र. हानमंतराव पवार, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम रा. गोरेगाव ता. नायगाव जि. नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

दावा- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारसहक प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत सदबा पि. कामाजी घोरबांड यांचा मृत्यु दिनांक ३१/०८/२०२२ रोजी नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र. २ हा मुलगा असुन अर्जदार क्र. ३ ते ७ हया मयताच्या मुली आहेत. सदरच्या अर्जात अर्जदारांनी अर्जदार क्रमांक १ ते ७ हे मयताचे वारसदार आहेत असे नमुद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटणा द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक ०६/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणा वर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
क. लिपिक
सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड



जा.क्र.२-क्षेका/नांवाशमनपा/८६९/२०२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक : ०७/१०/२०२६

## जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.क्षेका.२/NT/१५२९५/४०/२०२६-२७**
**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सौ. **सुनिता भ्र.सतिष फुके** रा.**विष्णु कॉम्प्लेक्स,**नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, **सीटी सर्वे नं.६३७६ पैकी दुकाण नं.सी/७** ज्याचा महानगरपालिका **मालमत्ता क्र.१-१७-१३७७, (४०२०१०७९५६)** श्री. **उदय उत्तम पवार** यांच्या नावे असलेली मालमत्ता यांचेकडून अर्जदाराने **विक्रीखत क्र.२४२१ दि.१९/०६/२००३** च्या आधारे विकत घेतली आहे./वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नावे कर आकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे. तरी या संबंधात कोणास कांही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (७) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. नसता वरील अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नावाने वरील प्रमाणे मालमत्ता नोंद घेण्यात येईल.

**चतुःसिमाः- पुर्वेस**- १० फुट रुंद रस्ता आहे, **पश्चिमेस-** पायऱ्या वरच्या मजल्यावर जाण्या करता आहे, **दक्षिणेस-**दुकाण नं.सी/७ उत्तमराव पवार यांचे आहे, **उत्तरेस-**दुकाण नं.सी/५ सत्यनारायणसिंह तेहरा यांचे आहे.

स्वाक्षरित/-
**सहाय्यक आयुक्त**
क्षेत्रिय कार्यालय-२ अशोकनगर
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

# दुष्काळग्रस्तांसाठी हदगाव तलाठी संघटनेचा मदतीचा हात

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर दुष्काळग्रस्त शेतकरी व नागरिकांच्या मदतीसाठी हदगाव तालुका तलाठी संघटनेने सामाजिक बांधिलकी जपत कौतुकास्पद पुढाकार घेतला आहे. तालुक्यातील ४५ तलाठी व ८ मंडळ अधिकाऱ्यांच्या एक दिवसाच्या पगाराची रक्कम दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी शासनाकडे जमा करण्याचा निर्णय संघटनेने सर्वानुमते घेतला आहे.

हदगाव तालुका तलाठी संघटनेच्या नवनिर्वाचित तालुका अध्यक्षपदी प्रकाश हसनाबादे यांची निवड झाल्यानंतर या सामाजिक उपक्रमाची घोषणा करण्यात आली. ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकाऱ्यांच्या सर्वानुमते हा निर्णय घेण्यात आला असून, संकटाच्या काळात शासनाच्या मदतकार्यात आपला सहभाग नोंदविण्याचा निर्धार संघटनेने व्यक्त केला आहे.यंदा तालुक्यात अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्याने शेती व्यवसायावर मोठा परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्याचबरोबर आगामी काळात पिण्याच्या पाण्याचा तसेच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर होण्याची चिन्हे आहेत. अशा परिस्थितीत दुष्काळग्रस्त शेतकरी व नागरिकांना शासनाच्या माध्यमातून आवश्यक मदत मिळणे गरजेचे आहे. महसूल प्रशासनाचा महत्त्वाचा घटक असलेल्या तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी आपल्या कर्तव्याबरोबरच सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत एक दिवसाचा पगार मदतीसाठी देण्याचा निर्णय घेतल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.दुष्काळाच्या संकटात शेतकरी व नागरिकांच्या पाठीशी उभे राहण्यासाठी इतर सामाजिक संस्था, संघटना तसेच सेवाभावी व्यक्तींनीही पुढे यावे, असे आवाहन हदगाव तालुका तलाठी संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

# सातबारा आणि फार्मर आयडी अभावी शेतकरी डिजिटल चक्रव्यूहात अडकले



धर्माबाद/प्रतिनिधी-गेल्या आठ दिवसांपासून महसूल आणि कृषी विभागाचे डिजिटल सातबारा व फार्मर आयडी चे संकेतस्थळ पूर्णपणे ठप्प असल्यामुळे नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद तालुक्यातील शेतकरी प्रचंड संकटात सापडले आहेत. दुष्काळी मदत, पीक नुकसान भरपाईचे पंचनामे आणि बँकांची कर्ज नूतनीकरणाची कामे ऐन वेळेवर खोळंबल्याने तालुक्यातील शेतकरी महसूल प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त करत आहेत.

तालुक्यात सध्या पीक नुकसानीच्या शासकीय मदतीसाठी आणि पंचनाम्यांसाठी कागदपत्रे गोळा करण्याचे काम सुरू आहे. यासाठी प्रशासनाने चालू वर्षाचा सातबारा आणि फार्मर आयडी अनिवार्य केला आहे. मात्र, सर्व्हर डाऊन असल्यामुळे ही प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाली आहे.धर्माबाद शहर तसेच तालुक्यातील सालेगाव, पांगरी, करखेली, चोंडी, धानोरा यांसारख्या विविध गावांतील शेतकरी सकाळीच कामाधंद्याचे नुकसान करून महा-ई-सेवा केंद्रांवर रांगा लावत आहेत. दिवसभर ताटकळल्यानंतर यंत्रणा बंद आहे, उद्या या हे एकच उत्तर ऐकायला मिळत असल्याने शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जाते. ऑक्टोबर महिना सुरू असल्याने रब्बी हंगामासाठी पीक कर्ज, नवीन कर्ज मंजुरी आणि जुन्या कर्जाच्या नूतनीकरणासाठी बँकांकडून तातडीने डिजिटल स्वाक्षरी असलेला सातबारा मागितला जात आहे. संकेतस्थळ उघडत नसल्याने बँकांनी कामे थांबवून ठेवली आहेत.एकीकडे निसर्गाने पीक हिरावून घेतले आहे. आणि दुसरीकडे सरकारच्या नादुरुस्त ऑनलाइन यंत्रणेने आमची कोंडी केली आहे. डिजिटल इंडियाच्या गप्पा मारणाऱ्या प्रशासनाला ८ दिवस होऊनही साधे संकेतस्थळ नीट करता येत नाही, यावरून सरकारला शेतकऱ्यांची किती काळजी आहे हे दिसून येते, अशी संतप्त प्रतिक्रिया धर्माबाद तालुक्यातील शेतकऱ्यांनी दिली आहे. धर्माबाद तहसील कार्यालय आणि जिल्हा प्रशासनाने तात्काळ वरिष्ठ पातळीवर संपर्क साधून हा तांत्रिक बिघाड दुरुस्त करावी, अन्यथा शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहिल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा तालुक्यातील शेतकऱ्यांनी दिला आहे.

# देगलूर तालुक्यातील कोरड्या दुष्काळाचे संकट

## विविध कामांसाठी आमदार निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय

देगलूर/प्रतिनिधी-पावसाने पाठ फिरवल्याने देगलूर तालुक्यात कोरडा दुष्काळ निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात पाणीटंचाईची संकट उभे टाकले आहे. विहिरी, बोरवेल व जलस्त्रोताच्या पाणी पातळीत घट होत असल्याने आगामी काळात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत शासनाने पाणीटंचाई निवारणासाठी आमदार स्थानिक विकास कार्यक्रमातून विविध कामांना निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतल्याने देगलूर तालुक्यातील दुष्काळग्रस्त गावांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ५ ऑक्टोंबर रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील २६५ तालुके दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात आले असून, पाणीटंचाईवर मात करण्यासाठी स्थानिक पातळीवर विविध उपाय योजना करण्यास मान्यता देण्यात आली आहे. देगलूर तालुक्यातील पाणीटंचाईची संभाव्य तीव्रता लक्षात घेता गावागावांतील पाणीपुरवठा व्यवस्था सक्षम करणे, नवीन विंधन विहिरी व ट्यूबवेल घेणे, पाईपलाईन व पाण्याच्या टाक्यांची दुरुस्ती करणे, तसेच गरजेनुसार तात्पुरत्या पाणी पुरवठ्याची व्यवस्था करणे आवश्यक्य ठरणार आहे.तेव्हा दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर देगलूर तालुक्यातील गरजू गावांची वस्तुनिष्ठ पाहणी करून ज्या गावांना तातडीने पाण्याची गरज आहे त्या गावांना प्राधान्याने उपाय योजना मिळणे गरजेचे आहे. शासन निर्णयानुसार पाणीटंचाईग्रस्त ग्रामीण व नागरी भागात कमाल २५ लाख रुपयाच्या आर्थिक मर्यादित अशी कामे मंजूर करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. यामध्ये तात्पुरत्या नळ पाणीपुरवठा योजना, नवीन नळ जोडणी, पाईपलाईन व टाक्यांची विशेष दुरुस्ती, व्हेरी खोल करणे व गाळ काढणे यासह विविध पाणीपुरवठा कामांचा समावेश आहे.

# हदगावमध्ये चोरीचा प्रयत्न करणारे पाच चोरटे सीसीटीव्हीत कैद

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरातील कमलाईनगरमध्ये चोरीचा प्रयत्न करणारे चार ते पाच चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाले आहेत. या चोरट्यांना पोलीस कधी पकडणार असा सवाल जनतेतून विचारला जात आहे.

दि. ४ व ५ ऑक्टोबर रोजीच्या मध्यरात्री शहरातील कमलाईनगर परिसरात सुमारे पाच संशयित चोरटे मुक्तपणे घरांची रेकी व फिरताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहेत. यातील काही जणांनी परिसरातील घरांमध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न केल्याचेही दिसून येत असल्याची माहिती आहे.विशेष म्हणजे, काही संशयितांचे चेहरे सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्ट दिसत आहेत. दि. ४ आणि ५ ऑक्टोबरच्या मध्यरात्री शहरातील कमलाईनगर परिसरात काही संशयित चोरटे फिरताना दिसून आले. मध्यरात्री निर्भयपणे परिसरात फिरणाऱ्या या संशयितांच्या हालचाली सीसीटीव्हीत कैद झाल्याने शहरातील सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. दरम्यान, या पूर्वी १९ व २० सप्टेंबरच्या मध्यरात्री शहरातील गजबजलेल्या बाजारपेठेत सीएसपी सेंटरसह तीन बीअर बार आणि एका देशी दारूच्या दुकानाला चोरट्यांनी लक्ष्य केल्याची घटना घडली होती. दुकानांचे कुलूप तोडून चोरीचा प्रयत्न करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले होते. चोरीच्या घटनानंतरही मागील घटनांचा तपास पूर्ण होण्यापूर्वीच पुन्हा संशयित चोरटे सीसीटीव्हीत कैद झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, चोरीचा प्रयत्न झालेला परिसर हा पोलिस निरीक्षकांच्या निवासस्थानाच्या आसपासचा असल्याची चर्चा आहे. त्यामुळे शहराच्या सुरक्षा व्यवस्थेबाबतच प्रश्न उपस्थित होत असून, पोलिसांच्या कार्यपद्धतीवरही नागरिकांकडून सवाल उपस्थित केले जात आहेत. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांच्या हालचाली सीसीटीव्हीत कैद झाल्या असून काहींचे चेहरेही स्पष्ट दिसत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पोलिसांनी फुटेज ताब्यात घेऊन तांत्रिक तपासाच्या माध्यमातून संशयितांची ओळख पटवावी आणि त्यांना तातडीने अटक करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# जिल्ह्यातील २०२३ च्या अतिवृष्टीसाठी विमा भरपाई देण्याचे आदेश

## खा.अशोक चव्हाण व आ.श्रीजया चव्हाण यांचे प्रयत्न यशस्वी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यातील 'खरीप २०१३' च्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेबाबत सुमारे दीड लाख शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारींना अखेर न्याय मिळाला असून, राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीने युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीचे अपिल फेटाळून लावले आहे. या निर्णयामुळे तक्रारदारांचे १०० टक्के विमा संरक्षीत क्षेत्र बाधीत झाल्याचे गृहीत धरुन प्रशासनाने गावनिहाय निश्चित केलेल्या किमान नुकसान टक्केवारीपेक्षा जास्त नुकसान भरपाई शेतकऱ्यांना मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

गेल्या २१ सप्टेंबर रोजी या प्रकरणाची सुनावणी झाली होती. या सुनावणीत माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण आणि आ. श्रीजया चव्हाण यांनी सदर विमा कंपनीच्या भूमिकेवर तीव्र संताप व्यक्त करून ते केवळ वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप केला होता. विमाधारक शेतकऱ्यांनी मांडलेली भूमिका योग्य असून, त्यांना तातडीने भरपाई देण्याची मागणीही केली होती. राज्याचे कृषि सचिव तथा पंतप्रधान पीक विमा योजनेच्या राज्य स्तरीय तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष परिमल सिंह यांच्या आदेशात देखील ही बाब नमूद करण्यात आली आहे. २०२३ च्या खरिपात नांदेड जिल्ह्यात प्रचंड अतिवृष्टी होऊन पूरस्थिती निर्माण झाली होती. या नैसर्गिक संकटात युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीने कमी भरपाई दिल्याची आणि हजारो शेतकऱ्यांना भरपाई नाकारल्याची शेतकऱ्यांची तक्रार होती. अनेक शेतकऱ्यांनी ही बाब माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी २२ ऑगस्ट २०२४ रोजी तत्कालीन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांची भेट घेतली होती. पीक विमा भरपाईबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारी नोंदवण्याची संधी उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली होती. त्यानुसार कृषी विभागाने शेतकऱ्यांना तक्रारी नोंदवण्याचे जाहीर आवाहन केले होते. या अनुषंगाने नांदेड जिल्ह्यातून सुमारे दीड लाख तक्रारी दाखल झाल्या होत्या. त्यावर सुनावणी घेऊन जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीने तक्रारदारांचे १०० टक्के विमा संरक्षीत क्षेत्र बाधीत झाल्याचे गृहीत धरुन प्रशासनाने गावनिहाय निश्चित केलेल्या किमान नुकसान टक्केवारीपेक्षा जास्त नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले होते. मात्र, या निर्णयाविरूद्ध सदर कंपनीने राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीकडे अपिल दाखल केले होते.

# जिलेटीन स्फोटातील मृतांच्या कुटूंबियांना दहा लाखांची मदत द्यावी

## एमपीजेसह सामाजिक संघटनांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

उमरखेड/प्रतिनिधी-ढाणकी रोडवरील किसान वेल्डिंग वर्क्स येथे २७ सप्टेंबर रोजी अवैध जिलेटीन व डेटोनेटरचा भीषण स्फोट होऊन पाच जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत काही जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना दहा लाख रुपये आर्थिक मदत द्यावी अशी मागणी मूव्हमेंट फॉर पीस अँड जस्टीस (एमपीजे) आणि विविध सामाजिक संघटनांनी एका निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची मागणी करण्यात आली. तसेच गंभीर जखमींना प्रत्येकी ५ लाख रुपये, तर किरकोळ जखमींना ५० हजार रुपयांची मदत देण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. अवैध जिलेटीन व डेटोनेटरचा साठा नेमका कुठून आला, त्यामागे कोण आहे आणि अशा प्रकारे अवैध स्फोटकांचा साठा कुठे-कुठे करण्यात आला आहे, याची विशेष तपास पथकामार्फत (एसआयटी) सखोल चौकशी करावी. दोषींवर कठोर कारवाई करून भविष्यात अशा दुर्घटना घडू नयेत यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली. या दुर्घटनेमुळे संबंधित कुटुंबांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट झाली असून, शासनाने तातडीने मदतीचा हात देण्याची गरज असल्याचे सामाजिक संघटनांनी म्हटले आहे. यावेळी देवानंद मोरे, अँड. अन्सार, उत्तम बरबड, सिराजुल हक, बालाजी वानखेडे, रेखा गायकवाड, समरीन बाजी, हाफीज मुसेब, अन्सार हुसैनी, प्रा. गजानन दामोदर, मोहसीन राज, डॉ. फारूक अबरार, अ. जहीर मंसुरी, तौफिक राज, तसलीम अहेमद, सरफराज अली, मुजाहीद खान आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# डॉ.हंसराज जाधव यांचे व्याख्यान

नांदेड/प्रतिनिधी-नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने १० ऑक्टोबर रोजी पैठणच्या प्रतिष्ठान महाविद्यालयातील मराठीचे प्राध्यापक, कथाकार डॉ.हंसराज जाधव यांचे महाराष्ट्रातील परिवर्तनाची शाहिरी या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

नायगाव तालुक्यातील वजीरगाव हे डॉ.हंसराज जाधव यांचे मूळ गाव. या ग्रामीण भागात नाट्यमंडळ व कलापथक चालवणारे ज्येष्ठ कलावंत शाहीर दामोदरराव वजीरगावकर यांचे डॉ. हंसराज हे सुपुत्र होत. २०१० पासून प्रतिष्ठान महाविद्यालयात ते कार्यरत आहेत. महानुभाव साहित्य, संत साहित्य आणि आधुनिक शाहिरी परंपरा ही त्यांची विशेष अभ्यासक्षेत्रे आहेत. सायन्स कॉलेज जवळच्या नरहर कुरुंदकर स्मारकात सायंकाळी ६ वाजता होणाऱ्या या व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

पान १ वरुन

### राजकीय नेत्यांसह...

आठवण सांगितली. परेश रावल आणि मनोज बाजपेयी यांनीही त्यांच्या अभिनयाचा आणि कलाकारांच्या पिढ्यांवर पडलेल्या प्रभावाचा गौरव केला.

**रितेश देशमुख**-अभिनेते रितेश देशमुख यांनी नाना यांच्या निधनाने मोठा धक्का बसल्याची भावना व्यक्त केली. नानांसोबत काम करण्याची इच्छा अपुरी राहिल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.नाना पाटेकर यांच्या निधनाने केवळ एक लोकप्रिय अभिनेता नव्हे, तर आपल्या अभिनयाने अनेक पिढ्यांना प्रभावित करणारा कलावंत आणि सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांच्या अभिनयाचा ठसा आणि सामाजिक कार्याची आठवण कायम राहणार आहे.

### विरोधकांचे सलग तिसऱ्या...

करत ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी राहुल गांधी यांनी केली.मंगळवारी राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडीचे खासदार केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे निघाले होते. मात्र, पोलिसांनी त्यांना अडविल्यानंतर राहुल गांधी यांनी आकाशवाणी भवन परिसरात ठिय्या आंदोलन केले. सुमारे आठ तासांनंतर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले.बुधवारी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी इंडिया आघाडीच्या खासदारांना स्नेहभोजनासाठी आमंत्रित केले होते. त्यानंतर खासदार जंतर-मंतरच्या दिशेने निघाले. मात्र, पोलिसांनी त्यांना वाटेतच रोखले. राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्यासह अनेक खासदारांना पोलिसांनी ताब्यात घेतले.आज पुन्हा एकदा इंडिया आघाडीचे खासदार राजघाटाच्या दिशेने रवाना झाले आहेत. शांततापूर्ण पद्धतीने आंदोलन करण्यात येणार असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले. गेल्या दोन दिवसांपासून सरकार विरोधकांना आंदोलन करू देत नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

# शिंदे गटाचा युक्तिवाद संपला;आता सिब्बलांचा प्रतिवाद

नवी दिल्ली:शिवसेना पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण निवडणूक चिन्ह कोणाला मिळावे, यासंदर्भातील वादावर सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीला आता महत्त्वाचे वळण मिळाले आहे. एकनाथ शिंदे गटाच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ नीरज किशन कौल यांचा युक्तिवाद पूर्ण झाला असून, आता उद्धव ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल प्रतिवाद मांडणार आहेत.

शिंदे गटाने निवडणूक आयोगाने घेतलेल्या निर्णयाचे सर्वोच्च न्यायालयात समर्थन केले. आयोगाकडे २०११ नंतरची शिवसेनेची कोणतीही सुधारित पक्षघटना सादर करण्यात आली नव्हती, असा युक्तिवाद कौल यांनी केला. आयोगाकडे उपलब्ध असलेली पक्षघटना २०११ सालचीच असल्याचे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.शिंदे गटाने केवळ आमदारांच्या संख्याबळावर नव्हे, तर पक्षाची संघटनात्मक रचना, अंतर्गत लोकशाही आणि निवडणूक आयोगाच्या अधिकारांवरही आपली बाजू मांडली. अपात्रतेच्या याचिका प्रलंबित असतानाही निवडणूक आयोगाला पक्ष व चिन्हाबाबत निर्णय घेण्यास कायदेशीर अडथळा नव्हता, असा युक्तिवादही करण्यात आला.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान निवडणूक आयोगाच्या निर्णयावर काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. अपात्रतेचा मुद्दा प्रलंबित असताना संबंधित गटाला पक्षाचे चिन्ह देणे योग्य ठरते का, तसेच दलबदलाच्या आरोपांचा पक्षाच्या चिन्हावरील दाव्यावर परिणाम होऊ शकतो का, याबाबत न्यायालयाने सवाल केले. यापूर्वी न्यायालयाने दोन्ही गटांना स्वतंत्र चिन्हांवर निवडणूक लढण्याची संधी देण्याऐवजी धनुष्यबाण चिन्ह एका गटाला देण्यामागील निवडणूक आयोगाच्या निकषांवरही प्रश्न उपस्थित केले होते. त्यामुळे पक्षाचे संघटन, विधिमंडळातील बहुमत, पक्षघटना आणि निवडणूक आयोगाचे अधिकार हे मुद्दे या सुनावणीत केंद्रस्थानी आहेत.

### टी.सी.हरवली आहे

बालाजी रामराव साळवे आठवी पासची जिल्हा परिषद हायस्कूल हदगांवची टी.सी. प्रवास करत असताना गहाळ झालेली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावे.
संपर्क पत्ता- भारत मेडीकल हनुमान मंदीर परिसर,हदगाव ता.हदगांव जि.नांदेड.
मो.नं.९४२०९१३३८६

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अँण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४